मुंबई
शुक्रवार, दि. ८ फेब्रुवारी २०१३

लोकमत Hello मुंबई

# 'पॅनोरमा'तून उलगडले नृत्यसंगीताचे रचनाबंध

मुंबई | दि. ७ (प्रतिनिधी)

**बागेश्री** रागातील 'जारे बलमा तोसे नही बोलू', भिन्न षड्जमधील 'जा रे जा रे जा कगवा', मल्हार रागामधील 'सकल घन गगन पवन' या आणि अशा अनेक शास्त्रीय बाजाच्या रचनांमधून रंगमंचावर नृत्याविष्कार पेश होत राहिले आणि रंगप्रकाशाच्या खेळात विहंगम दृश्यमालिका साकार होत गेल्या. प्राचीन-अर्वाचीन, पूर्व-पश्चिम अशा कलामूल्यांचा मिलाफ साधणाऱ्या 'पॅनोरमा'च्या सादरीकरणातून अभिजात शास्त्रीय संगीत आणि पाश्चात्त्य ध्वनी माध्यमाची अनोखी संकल्पना अनिता कुलकर्णी यांनी रंगमंचावर पेश केली. कथ्थक, भरतनाट्यम व रागसंगीतावर दृक्श्राव्य रंगसंगीताचा साज चढवून 'पॅनोरमा'ची रसनिर्मिती साधली गेली.

आसमंतात मनसोक्त विहार करताना पक्ष्यांना सभोवती दिसणाऱ्या दृश्यांच्या प्रतिमा म्हणजे 'पॅनोरमा'. या पॅनोरमाची पेशकश सावरकर सभागृहाच्या व्यासपीठावर करण्यात आली. तब्बल २५ कलावंतांची मोट बांधून, मूळच्या वास्तुविशारद असलेल्या परंतु रोमारोमात संगीत भिनलेल्या अविता कुलकर्णी यांनी हा 'पॅनोरमा' साकारला. यात परमेश्वरी या रागाचे प्रतिबिंब असलेली 'दिर दिर तनोम', चाढकेसी रागातील 'सुपनवा मे आओ ना हरी' अशा अनेक रचना कथ्थक व भरतनाट्यम या नृत्यशैलींच्या फ्युजनमधून सादर केल्या. शीतल कोलावलकर, परिमल फडके व त्यांच्या समूहाने या रचना पेश केल्या. कथ्थक नर्तक मयूर वैद्य याने 'देस रंग'मधून तालवाद्य, सतार व कथ्थक यांच्या मिलाफातून बंदिशींचे भाव दृगोच्चर केले.

रागाची संकल्पना सर्वसामान्य माणसापर्यंत नेण्याचा आणि त्याच्यात व शास्त्रीय संगीतात उभी राहिलेली भिंत पाडण्याचा माझा प्रयत्न आहे. जनसामान्यांपर्यंत मला शास्त्रीय संगीत पोहोचवायचे आहे, असे मत 'पॅनोरमा'विषयी बोलताना अनिल कुलकर्णी यांनी मांडले. केवळ संगीताचे वेड एवढे एकच कारण या प्रयोगामागे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### शो मस्ट गो ऑन...

'पॅनोरमा'मधील कथ्थक नृत्य सादर करताना मयूर वैद्य याच्या गुडघ्याच्या सांध्याला अचानक दुखापत झाली. उभे राहता येणेही कठीण होत \असताना मयूरने चेहऱ्यावरचे हास्य कायम ठेवत कथ्थक रचना शेवटपर्यंत रंगविली आणि शो मस्ट गो ऑन या उक्तीची प्रचिती दिली. रसिकांनीही त्याच्या कलेविषयीच्या निष्ठेला दाद दिली.